17 5 कक्ष
गृहशास्त्र - प्रयोगशाळा
संगीत विभाग रेकॉडींग UGF

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2016-17
<u>प्रशासकिय मान्यता व निधी वितरण आदेश</u>
**शासकिय महाविद्यालयांचा विकास**

**जिल्हा नियोजन समिती**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर**
क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-5/1601/2016-17
दिनांक : 17/09/2016

वाचा 1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444 दि. 16/02/08
2) कार्यालयीन आदेश क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-5/1260/2016-17, दिनांक : 16/07/2016
3) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांचे पत्र क्र.वनाशाकवसो... स्टेनो/ 1037/2016, दिनांक: 15/06/2016.

---

उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 नुसार सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत स्थानिक स्व... संस्थाकडील योजना/कामे वगळुन या निधीतील कामांना प्रशासकिय मान्यता देण्याचे व निधी वितरणाचे अधि... जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यांना प्रदान केले आहेत.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण 2016-17 अंतर्गत उच्च शिक्षण या उपलेखाशिर्षा... ***शासकिय महाविद्यालयांचा विकास*** *या योजनेअंतर्गत रु. 425.00 लक्ष* तरतुदी अर्थसंकल्पीत असुन बी.डी... संगणक कार्यप्रणालीद्वारे प्राप्त आहे. संदर्भ क्र. 2 चे आदेशान्वये सदर योजनेंतर्गत आतापर्यंत रु. 175.00 लक्ष निधी संबंधित यंत्रणांना वितरीत करण्यात आलेला आहे.

संदर्भातील क्र. 3 अन्वये उच्चशिक्षण या उपलेखाशिर्षा खालील **शासकिय महाविद्यालयांचा** विकास या योजनेअंतर्गत **संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर** यांचेक... गृहशास्त्र विभागाकरिता प्रयोगशाळेचे बांधकाम संगीत विभागाकरिता रेकॉर्डींग कक्षाचे बांधकाम व ... महाविद्यालय इमारतीवरील तिस-या माळयावर 5 कक्षांचे विद्युत कार्यासह बांधकाम करणे या 3 कामां... रु.149.82 लक्ष किमतीचा निधी मागणी प्रस्ताव अंदाजपत्रकासह प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त संदर्भ शासन निर्णय क्र. 1 च्या अधिन राहुन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2016-17 अंतर्गत **शासकिय महाविद्यालयांचा विकास** या योजनेअंतर्गत **संचालक, वसंतराव नाईक शासकीय** कला... **समाजविज्ञान संस्था, नागपूर** यांना वरील कामावरील खर्च भागविणेसाठी रु. <u>149.82</u> **लक्ष** चे खर्चास खाली... अटी व शर्तीचे अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत असुन **रू. 125.00 लक्ष (अक्षरी** रूपये ... **कोटी पंचविस लक्ष फक्त)** एवढा निधी संबंधितांना **विवरणपत्रात** व परिशिष्टात दर्शविलेल्या कामांवर वि... करण्यात येत आहे. सदरचा निधी खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

**मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत**

स्वा/-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर

**अटी व शर्ती :**

1. **योजनेबाबत** शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शकसुचना, निकष तपासणी सुची, अटी व शर्तीनुसार योजनांवर/कामांवर खर्च करणे बंधनकारक राहील
2. खर्चाची बाब शासन मान्य असल्याची खात्री केल्यावरच योजनांवर खर्च करावा.
3. सन 2016-17 मधील या योजनेच्या कामावर मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालु वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावा.
4. जिल्हा योजनांकरीता वितरीत केलेले अनुदान ज्या योजनेकरीता/प्रयोजना करीता मंजूर करण्यात आले आहे त्याच योजनेवर/प्रयोजनांसाठी खर्च करणे बंधनकारक राहील.
5. **कामाचे वेगवेगळे पातळीचे छायाचित्र काढुन वेळोवेळी सादर करावे व अभिलेख्यासाठी संग्रही ठेवावे.**
6. सदर काम अथवा कामाचा भाग या कार्यक्रमाव्यतीरीक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत अथवा योजनेतर कामात अंतर्भुत नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी.
7. सदर योजनेसाठी आपल्या प्रशासकिय विभागाने दिलेल्या सुचनानुसार/लेखापद्धतीप्रमाणे या कार्यक्रमाचा हिशेब योजनानिहाय स्वतंत्र ठेवावा.
8. **तांत्रिक मंजूरी प्राप्त झाल्याशिवाय निधी खर्च करण्यात येऊ नये.**
9. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याबरोबर काम पुर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादी बाबतची माहिती आपल्या मंत्रालयीन प्रशासकिय विभागास व कार्यालयास सादर करावी. यासंबंधिची जबाबदारी संबंधित प्रशासकिय विभागाची राहील.
10. योजनापुर्ण होण्यास एकापेक्षा अधिक वर्षाचा कालावधी लागणार असल्यास त्यायोजनांच्या पुर्ततेबाबत वेळोवेळी सनिरीक्षणाद्वारे योजना वेळेतच पुर्ण होण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.
11. योजना पुर्ण झाल्यावर त्यावर पुन: तरतुद केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
12. कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्विती यंत्रणेची राहील.
13. शासनाचे प्रचलित नियम विहीत कार्य पध्दतीनुसार निविदा व खरेदी प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक राहील.
14. *मंजुर करण्यात आलेल्या कामांची निविदा प्रक्रिया विहीत मापदंडास अनुसरून इ-टेंडरीग* (E-tendering) द्वारे करण्यात यावी.
15. योजना राबविण्याची सनियंत्रण व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची किंवा शासकिय अभिकरणाची राहील.
16. *नविन योजनांच्या बाबतीत संबंधित मंत्रालयीन विभागांची तांत्रिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्याशिवाय* निधी खर्च करता येणार नाही.
17. जिल्हा वार्षिक योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहील.
18. जिल्हा योजनेसंबंधी विधी मंडळास माहिती सादर करणे तसेच विधी मंडळाच्या मागदर्शक सुचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पिय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकिय विभागाची राहील.
19. सदर योजनेत समाविष्ट असलेले काम/कामे अन्य कोणत्याही योजनेतुन घेण्यात आलेली नाहीत, याबाबतची खात्री करावी व कामाची द्विरूक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
20. जिल्हा वार्षिक योजनेतुन प्रस्तुत करण्यात आलेली कामे अनधिकृत/बेकायदेशिर/वादातीत अशा जागेवर होणार नाहीत याची दक्षता घ्यावी

21. या योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांची नोंद मालमत्ता नोंदवहीत करून त्या कामाचे परीरक्षण करण्याची खबरदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावी.
22. कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या मासिक खर्चाचे अहवाल दरमहा 5 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.
23. या कार्यक्रमावर होणारा खर्च रोखप्रवाहानुसार करावा.

नियोजन विभागमागणी क्र. ओ-38

2202 सर्वसाधारण शिक्षण
03 विद्यापिठीय व उच्च शिक्षण
103 शासकिय महाविद्यालये व संस्था
(55) जिल्हा योजना नागपूर
(55)(06) शासकिय कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षण शास्त्र अध्यापक महाविद्यालयाची गुणवत्ता वाढ सुधा कार्यक्रम (2202 बी 536)
27 लहान बांधकामे

**प्रति, संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर**

**प्रत - माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह सादर/अग्रेषित**

1. मा. प्रधान सचिव व विकास आयुक्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
2. मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32.
3. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महा. राज्य पुणे-1
4. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
5. महालेखापाल महाराष्ट्र-2 नागपूर (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)
6. सहसंचालक, उच्च शिक्षण,नागपुर.
7. वरिष्ठ जिल्हा कोषगार अधिकारी, नागपूर
8. लेखा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती नागपूर

**मुळ प्रत मा.जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत**

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर करिता

आदेश क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-5/1601/2016-17, दिनांक : 17/09/2016

विवरणपत्र

सर्वसाधारण योजनेखालील 2016-17 चे तरतुदीचे वितरण

(रू.लाख

| चे नाव | कार्यान्विती यंत्रणा अधिकारी | सन 2016-17 चा मंजूर नियतव्यय | उपलब्ध तरतुद | यापुर्वी वितरीत तरतुद | वित |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 5 | | |
| च्च | **संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर** | 425.00 | 125.00 | 0.00 | 12 |
| | **संचालक, शासकीय विज्ञान संस्था नागपूर** | | 175.00 | 175.00 | |
| कीय ालयांचा कास | **संचालक, न्याय सहाय्यक विज्ञान संस्था नागपूर** | | 50.00 | 00.00 | |
| | **संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केन्द्र, नागपूर** | | 75.00 | 0.00 | ( |
| | एकूण बेरीज | 425.00 | 425.00 | 175.00 | |

## परिशिष्ट

**चे नाव - संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर**

रु.लाखात

| . | यंत्रसामुग्रीचे नाव | प्रशासकिय मान्यता किंमत | वितरीत नि |
|---|---|---|---|
| | गृहशास्त्र विभागाकरिता प्रयोगशाळेचे बांधकाम (विद्युत व्यवस्था,स्पॉट वायरींग,ओटा बांधकाम,फर्निचर व इतर आवश्यक वस्तू) | 43.07 | 125.00 |
| | संगीत विभागाकरिता रेकॉर्डींग कक्षाचे बांधकाम करणे आवश्यक सर्व सुविधांसह | 29.58 | |
| | कनिष्ठ महाविद्यालय इमारतीवरील तिस-या माळयावर 5 कक्षांचे विद्युत कार्यासह बांधकाम करणे | 77.17 | |
| | **एकूण** | 149.82 | 125.00 |

**त मा.जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत**

जिल्हाधिकारी तथा सदस्य सा
जिल्हा नियोजन समिती, नागपूर क

